# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)


दूरध्वनी क्रमांक :
०२०— २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल : approval@unipune.ac.in


संदर्भ क्र. : सीसीओ/१४२२

दिनांक : १३/०७/२०२०

मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे, अहमदनगर, व नाशिक

विषय :— तासिका तत्वावरील नियुक्त केलेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करणेबाबत...

संदर्भ :— १) शासन निर्णय क्र. misc/2018/C.R56/18/UNI-1 दि. ०८/०३/२०१९
२) अखिल भारतीय तंत्र परिषद नवी दिल्ली दि. ०१/०३/२०१९ यांच्या संदर्भातील भारतीय राजपत्र क्र. ८२
३) शासन निर्णय क्र. सावेआ—११११/प्र.क्र.—४४/१९ ता.शि.२, दि. ११/०९/२०१९,
४) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१८/१८५/१८/मिशि—३, दि. १४/११/२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ १ ते ४ यांचे अवलोकन करुन तासिका तत्वावरील (CHB) नियुक्त केलेल्या शिक्षकांचे मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना पुढील प्रमाणे.

तासिका तत्वावरील नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या मान्यतेचे प्रस्ताव शासन निर्णय दि. १४/११/२०१८ मध्ये नमुद केलेल्या नियम व अटी पूर्ण करीत असलेल्या विनाअनुदानित महाविद्यालय / परिसंस्थानी दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत ऑनलाईन पदधतीने भरुन त्याची हार्डकॉपी आणि सीडी शैक्षणिक विभागास सादर करावी. अशा पात्र व विहीत प्रक्रिया पूर्ण केलेल्या उमेदवारांना शासन निर्णयाप्रमाणे मान्यता दिली जाईल. तसेच अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील शिक्षकांच्या मान्यतेचे प्रस्ताव वर्षभर स्विकारले जातील. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार उर्वरित शैक्षणिक वर्षाकरिता सदर मान्यता देण्यात येईल.

उपरोक्त नमुद केलेल्या कालावधी मध्ये शैक्षणिक वर्षासाठीचे तासिका तत्वावरील प्रस्ताव अंतिम मुदतीनंतर व अपूर्ण सादर केल्यास त्यावर शैक्षणिक विभागाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला

13/7/2020

सहायक कुलसचिव
(शिक्षक मान्यता कक्ष)